मंत्रालयातील अधिकारी/कर्मचारी वर्गाकरिता
कार्यालयीन वेळेत भोजनाच्या सुट्टीची वेळ
निश्चित करण्याबाबत.....

20160108110202070

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.समय-१०.००/प्र.क्र.३३/०१/२००१/१८ (र.व का.)
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दि. १८ सप्टेंबर, २००१.

वाचा : १) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.समय-१०८५/६४/१८ (र.व का.), दि.१३/६/१९८५,
२) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.समय-१०८५/६४/१८ (र.व का.), दि.१२/२/१९८७,
३) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.समय-१०८८/१९/अठरा (र.व का.), दि.३१/८/१९८८,
४) "उत्तम प्रशासनाची मानके" डॉ.माधव गोडबोले यांच्या समितीचा अहवाल, दि-२५ जुलै, २००१.

परिपत्रक :

बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयांच्या कामकाजाची वेळ ही सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.३० पर्यन्त राहील असे आदेश क्रमांक ३ वर दिनांक ३१.८.१९८८ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले असून त्यातील परिच्छेद-२ मधील अनुक्रमांक ५ मध्ये कार्यालयीन वेळेत भोजनाची सुट्टी अर्ध्या तासाची व चहापानाची सुट्टी १५ मिनिटांची राहील असे नमूद करण्यात आले आहे.

डॉ.माधव गोडबोले यांनी त्यांच्या "उत्तम प्रशासनाची मानके" क्र.४ वर दि.२५ जुलै, २००१ च्या अहवालात नमूद केले आहे की, सामान्य लोकांचे मनात अशी भावना/गैरसमज निर्माण झालेला आहे की, शासन फक्त कर्मचाऱ्यांसाठी, कर्मचाऱ्यांमार्फत व कर्मचाऱ्यांच्या हितासाठी आहे. कामासाठी शासकीय कार्यालयांस भेट दिली असता, अधिकारी/कर्मचारी हे बऱ्याच वेळा जागेवर नसतात व त्यांच्या गैरहजेरीसाठी काहीही सबळ कारणे नसतात.

मंत्रालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आदेश जरी असले तरी सुध्दा शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच वेळा भोजनाची वेळ अर्धा तास व चहापानाची वेळ १५ मिनिटे असतांना देखिल अधिकारी/कर्मचारी जागेवर नसतात. प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने व शासकीय कामकाजात गतिमानता व कार्यक्षमता आणण्यासाठी अधिकारी/कर्मचारी आपल्या जागेवर जास्तीत जास्त वेळ असणे क्रमप्राप्त आहे.

या परिपत्रकान्वये पुन्हा सूचना देण्यात येत आहेत की, कार्यालयीन वेळेत भोजनासाठी दुपारी १.०० ते २.०० या दरम्यान जास्तीत जास्त अर्ध्या तास वेळ असावी. चहासाठी वेळ देण्याची आवश्यकता नाही. कारण, चहाची ट्रॉली प्रत्येक मजल्यावर असते. भोजनासाठी अधिक वेळ अधिकारी/कर्मचारी घेणार नाहीत याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील. तसेच एका शाखेतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी एकाच वेळी भोजनासाठी बाहेर जाऊ नये. प्रत्येक शाखेत शाखाप्रमुखांनी/शाखा अधिकाऱ्यांनी चर्चा करुन भोजनाची वेळ ठरवून घ्यावी. वरील बाबींचे उल्लंघन झाल्यास त्यांनी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कडक कारवाई करावी असे आदेश देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(राजेंद्र सिंह)
प्रधान सचिव (प्रशु,रवका),महाराष्ट्र शासन.

मुख्यमंत्र्यांचे सचिवालय (५ प्रती)
[illegible]